मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
पुणे, पिंपरी-चिंचवड
मंगळवार, दि. 25 मार्च 2025 | पान- 1

# नवीन मालमत्ताधारकांकडे 87 कोटींचा कर बाकी

## करसंकलन विभागाकडून शहरातील मालमत्ताधारकांना 31 मार्चपूर्वी कराचा भरणा करण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मालमत्ता सर्वेक्षणांतर्गत नव्याने निदर्शनास आलेल्या प्रत्येक मालमत्तेच्या मालमत्ताधारकांना महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतूदीनुसार विशेष नोटीस देणेत येऊन आज अखेर ८९,००६ नवीन मालमत्ताधारकांना मालमत्ताकराचे अंतिम बिल प्रथमच वाटप केले असून या मालमत्तांची रुपये १६७ कोटी कराची मागणी निश्चिती कार्यवाही सुध्दा पूर्ण झाली आहे.



यापैकी आत्तापर्यंत ४७ हजार ४४८ मालमत्ताधारकांनी ७७ कोटीं कराचा भरणा महानगरपालिकेकडे केला आहे. त्याचबरोबर, ४१,५५८ मालमत्तांधारकांकडे अद्यापही ८७ कोटींचा कर येणे बाकी आहे. त्यांची करवसुली त्यांना एसएमएस, फोन, टेलिकॉलिंग करुन कार्यवाही सुरु आहे. मालमत्ता सर्वेक्षणाच्या माध्यमातून शहरामध्ये ज्या नव्या मालमत्तांची आकारणी झालेली आहे अशा मालमत्ताधारकांनी आपल्या मालमत्ताकराचा तत्काळ भरणा करावा. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

ज्या मालमत्तांची चालू वर्षी नव्याने आकारणी झाली आहे, अशा मालमत्तांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांपर्यंत विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. आत्तापर्यंत ३०,४४० मालमत्ताधारकांनी मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेतला आहे. सवलतीमध्ये ऑनलाइन स्वरूपात कर भरल्यास ५ टक्के, महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी घरास ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेस ५० टक्के, झिरो वेस्ट आणि 'एसटीपी प्लँट' कार्यान्वित असल्यास १० टक्के, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारल्यास २ टक्के, ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १० टक्क्यांच्या सवलतींचा लाभ घेता येणार आहे. त्यामळे ज्या मालमत्ताधारकांना माहे जानेवारी पासून मालमत्ता कराचे प्रथमच बिल मिळाले आहे अशा मालमत्तांना मालमत्ताकरावर विविध सवलती असून मालमत्ताधारकांनी ३१ मार्चपूर्वीच मालमत्ताधारकांनी कर भरुन सवलतीचा लाभ घ्यावा. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे. सबब ज्या ज्या मालमत्ताधारकांना महानगरपालिकेकडून कर महानगरपालिकेस जमा करणेसंदर्भात फोन येत आहे त्या फोनचा आदर करून आपला कर महानगरपालिकेकडे ३१ मार्च २०२५ पुर्वी जमा करावा. असेही आवाहन केले आहे.

> शहरातील सर्व प्रकारच्या मालमत्तांचे मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले असून नवीन आकारणी झालेल्या मालमत्तांना बिलांचे वाटपसुध्दा करण्यात आले आहे. सदर मालमत्ताधारकाकडे तब्बल ८७ कोटींचा कर येणे बाकी असून यापैकी काही मालमत्ता सवलतीस पात्र आहेत. त्यामुळे ज्या मालमत्ताधारकांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांचा काळ पूर्ण झालेला नाही अशा मालमत्ताधारकांनी ३१ मार्चपूर्वी कराचा भरणा करुन सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# पिंपरी-चिंचवडमध्ये उलघडणार धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा!

## दिवंगत हिराबाई लांडगे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कार्यक्रम : पोवाडा, सुश्राव्य गीते तसेच व्याख्यानाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शांती ब्रह्म सोशल फाऊंडेशनतर्फे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री दिवंगत हिराबाई किसनराव लांडगे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज शंभू शौर्यगाथा " या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

शांती ब्रम्ह सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय चौधरी यांनी याबाबतची माहिती दिली. येत्या दि.३१ मार्च रोजी सायंकाळी 6.30 वाजता सेक्टर क्रमांक 6, मोशी प्राधिकरण ग्राउंड, जलवायु विहार येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने सायंकाळी साडेसहा ते सव्वा सात यादरम्यान शाहीर श्री. गुरुप्रसाद नानिवडेकर आणि सहकारी श्री शिव शंभू चरित्र पोवाडा गायन करतील. त्यानंतर अतिथी सन्मान, सुप्रसिद्ध भजन लोकसंगीत गायक, पार्श्वगायक, संगीतकार व अभिनेता अवधूत गांधी यांच्या सुश्राव्य आवाजात विविध लोकसंगीत कार्यक्रमाचा आस्वाद घेता येणार आहे. सायंकाळी 8 वाजता इतिहासाचे गाढे अभ्यासक, प्रभावी वक्ते प्रा. नितीन बानुगडे "धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज" शंभू शौर्यगाथा या विषयावर बोलणार आहेत.




### मान्यवरांची उपस्थिती...!

कार्यक्रमाला अयोध्या श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी श्री गोविंददेव गिरी यांचे शुभाशिर्वाद लाभले आहेत. तर पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पी.एम.आर.डी.ए. आयुक्त डॉ. योगेश म्हसे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, संत तुकाराम महाराजांचे 21वे वंशज ह.भ.प. प्रशांत महाराज मोरे, कारागृह व सुधारसेवा महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, मल्लविद्या भूषण किसनराव लांडगे उपस्थित राहणार आहेत.

# विद्यापीठाच्या 82 कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 2025-26 या आर्थिक वर्षासाठी एकूण 566 कोटी रुपये जमा



### अर्थसंकल्पातील प्रमुख तरतुदी

- क्रांतीवर बिरसा मुंडा आदिवासी अध्यासन स्थापना - ५ लाख रुपये
- नाशिक, अहिल्यानगर उपकेंद्र इमारत बांधकाम – प्रत्येकी ५ कोटी रुपये
- प्राणीगृह बांधकाम – ३ कोटी रुपये
- विद्यार्थी विकास मंडळाच्या देखभाल आणि विकास – १२ कोटी ९६ लाख रुपये
- विद्यापीठातील पाणीपुरवठा योजना – ५० लाख रुपये
- विविध इमारतींमध्ये उद्वाहन व्यवस्थेसाठी – २५ लाख रुपये
- गुणवत्ता सुधार कार्यक्रम – १३ कोटी रुपये
- संशोधन योजना – ७ कोटी ५० लाख रुपये
- समर्थ भारत अभियान – ५० लाख रुपये
- युवा महोत्सव आणि स्पर्धा – १ कोटी ४० लाख रुपये

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. यंदा अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली असून, गेल्यावर्षीच्या तुलनेत १७ कोटी रुपयांनी तूट कमी झाली आहे. अर्थसंकल्पात चार शिष्यवृत्ती योजना, संशोधन, गुणवत्तावाढ, विद्यार्थी विकास, विद्यार्थी वसतिगृह अशा घटकांवरील भरीव तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा शनिवारी झाली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिसभेला प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे आदी उपस्थित होते. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाला अधिसभेने मान्यता दिली.

अर्थसंकल्पात विद्यार्थी विषयक सेवा व सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम, उपकेंद्रांचे बांधकाम यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच संशोधन प्रकल्प प्रसिद्धी, नाविन्यता जागरुकता योजना, बौद्धिक संपदा हक्क यासाठीही अर्थसंकल्पात विशेष तरतुद करण्यात आली आहे. संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थी वसतिगृहाच्या चौदा मजली दोन स्वतंत्र इमारती बांधण्यात येत आहेत. प्रत्येक वसतिगृहात ५१३ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होणार आहे. तसेच वसतिगृह क्षमता वाढ, आणि देखभाल आणि विकासासाठी २९ कोटी ५६ लाख रुपयांची तरतुद आहे.

विद्यार्थ्यांसाठीच्या चार शिष्यवृत्तींसाठीची तरतूद एक कोटी ८५ लाख रुपयांनी वाढवण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजनेसाठी १ कोटी २५ लाख रुपये, महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख रुपये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख रुपये, स्वामी विवेकानंद अर्थसहाय्य योजनेसाठी २ कोटी २५ लाख रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेअंतर्गत ७ कोटी ५० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

# चित्रपटाचे माध्यम मराठी भाषा संवर्धनासाठी उपयुक्त - विजयकुमार खोराटे

## चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन; दोन दिवस मराठी चित्रपट पाहण्याची शहरवासीयांना पर्वणी



> मराठी भाषेचा अभिमान बाळगत मराठी चित्रपट पाहण्यास प्राधान्य दिले पाहिजे. यामुळे अधिकाधिक दर्जेदार मराठी चित्रपट आपल्याला पाहायला मिळतील.
>
> **- बाबासाहेब पाटील, प्रदेशाध्यक्ष, मराठी चित्रपट असोशिएशन.**



**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. सातासमुद्रापार पोहोचलेल्या मराठी भाषेचा गोडवा अद्वितीय आहे.मराठी भाषेचे संवर्धन, भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मराठी चित्रपटासारखे माध्यम उपयुक्त ठरणार आहे. असे प्रतिपादन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.

'मराठी चित्रपट संवर्धन आणि प्रदर्शनास चालना' या बहूउद्देशीय संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाट्यगृहात चित्रपट' ही अनोखी संकल्पना राबविण्यात येत आहे. आज या संकल्पनेतून २४ ते २५ मार्च या कालावधीत चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे आयोजित चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले,त्यावेळी ते बोलत होते.

या महोत्सवास उप आयुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मराठी चित्रपट असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस कौस्तुभ कुलकर्णी, प्रमुख सल्लागार व सुप्रसिद्ध अभिनेते निळू फुले यांची कन्या गार्गी फुले,उपाध्यक्ष नितीन धवणे पाटील, विश्वजित बारणे, उपस्थित होते.

मराठी भाषेतील चित्रपट जगले पाहिजे त्यांचा प्रसार झाला पाहिजे यासाठी या मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. आपण देखील मराठी भाषेचा अभिमान बाळगत मराठी चित्रपट पाहण्यास प्राधान्य दिले पाहिजे यामुळे अधिकाधिक दर्जेदार मराठी चित्रपट आपल्याला पाहायला मिळतील. असे मत यावेळी बोलताना असोशिएशनचे कौस्तुभ कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

या महोत्सवांतर्गत नुकतेच प्रदर्शित झालेले मराठी चित्रपट अत्यंत नाममात्र दरात दाखवले जात आहेत.

# प्राणीसंग्रहालयावर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी सुरूच

## अवैध वाळू उपसा जोरात, लाखो ब्रास वाळूची चोरी -पिंपरी-चिंचवड अप्पर तहसीलदार यांचे होतेय दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या आठ वर्षांपासून बंद असलेल्या तसेच वादग्रस्त ठरलेल्या संभाजीनगर येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालयाचा पुढचा टप्पा वादात सापडला आहे.या प्राणीसंग्रहालयावर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी सुरू आहे. तर प्रशासनाने चक्क कमी दराने निविदा सादर केलेल्या ठेकेदाराला काम न देता ज्यादा दराने काम करणाऱ्या ठेकेदाराला काम देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या या चुकांमुळे महापालिकेचा कारभार चव्हाट्यावर आला असून अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत.



चिंचवडच्या संभाजीनगर येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाच्या सुशोभीकरणचे काम मागील आठ वर्षांपासून सुरु आहे. त्यावर यापूर्वी तब्बल २० कोटीपेक्षा अधिक खर्च झाला आहे. असे असताना या प्राणिसंग्रहालयाचे नूतनीकरण व सुशोभीकरणाचे काम संपलेले नाही. संथगतीने सुरु असलेल्या कामामुळे प्राणिसंग्रहालयाचे टाळे कायम आहे. कामादरम्यान प्राणिसंग्रहालयातील विविध प्राणी व पक्ष्यांचा मृत्यू झाला आहे. यावरून टीका आणि महापालिका प्रशासनाची बदनामी झाली .

प्राणीसंग्रहालयाच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आरोप यापूर्वी झालेले आहेत. सल्लागार नियुक्ती, वाढीव खर्च यावरून प्रशासनावर ताशेरे ओढण्यात आले होते. नागपूर येथील डिसेंबर २०२३ ला झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात यावरून गंभीर आरोप झाले होते. अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेची संपूर्ण राज्यात बदनामी झाली होती. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने कारभारात सुधारणा केली नाही.. निविदा प्रक्रियेत अटी-शर्ती व ठेकेदार निश्चितीचा शाब्दिक घोळ घालत दोन कोटींचे आर्थिक नुकसान करून हे काम देण्याचा घाट प्रशासनाने घातला आहे.

निविदाप्रक्रिया गुणांकन पध्दत, अटी-शर्तीचा वापर करून जास्त दराने काम दिले गेले. परिणामी, यात महापालिकेचे कोट्यवधींचे आर्थिक नुकसान होणार असल्याचे दिसून येत आहे. प्राणीसंग्रहालयावर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी सुरू आहे. तर प्रशासनाने चक्क कमी दराने निविदा सादर केलेल्या ठेकेदाराला काम न देता ज्यादा दराने काम करणाऱ्या ठेकेदाराला काम देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या या चुकांमुळे महापालिकेचा कारभार चव्हाट्यावर आला असून अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत.

### जादा दर सादर केलेल्या ठेकेदाराला काम

» केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या नियमानुसार प्राणिसंग्रहालयामध्ये आणखी काही कामे सुचविण्यात आली. त्यासाठी महापालिकेने २४ कोटी २ लाख १६ हजार ६८ रूपये खर्चाची निविदा ९ ऑगस्ट २०२४ ला प्रसिद्ध केली होती. त्यासाठी तीन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. त्यातील एक ठेकेदार अपात्र झाल्याने दोन ठेकेदारांच्या निविदा पात्र ठरल्या. यामध्ये हायवे कन्ट्रक्शन या कंपनीने १०.८९ टक्के कमी दराची निविदा, तर स्कायवे इंन्फ्राप्रोजक्टस कंपनीने ८.८८ टक्के ज्यादा दराची निविदा सादर केली होती. परंतु, दर कमी करून स्कायवे इंन्फ्राप्रोजक्टस या कंपनीची २ टक्के कमी दराची २३ कोटी ६४ लाख ९४ हजार ९२६ रूपये खर्चाची निविदा स्वीकृत करण्यात आली. मात्र, हे दर हायवे कन्ट्रक्शन कंपनीने सादर केलेल्या दराच्या तुलनेत अधिक आहेत. निविदाप्रक्रिया गुणांकन पध्दत, अटी-शर्तीचा वापर करून जास्त दराने काम दिले गेले. परिणामी, यात महापालिकेचे कोट्यवधींचे आर्थिक नुकसान होणार असल्याचे दिसून येत आहे.

> ठेकेदार निश्चित करताना गुणांकन पध्दतीचा वापर केलेला आहे. निविदेतील अटी-शर्तीप्रमाणे काम करण्यास पात्र, गुणवत्ताधारक ठेकेदार कंपनीला हे काम देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. प्राणीसंग्रहालयाचे विशेष काम असल्याने यामध्ये आर्थिक बाबींबरोबर ठेकेदार कंपनीची गुणवत्तादेखील विचारात घेतलेली आहे.
>
> - मनोज सेठिया, सहशहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

# नदीसुधार प्रकल्पाच्या विरोधात नागरिकांचे आंदोलन

## नदीसुधार प्रकल्पाच्या विरोधात नागरिक एकवटले; साखळी आंदोलनाचे फोटो अभियानाचे भासवत संकेतस्थळावर केले प्रसिद्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

नदीसुधार प्रकल्प राबवण्यासाठी सुरु असलेली वृक्षतोड, नदीपात्रातील काँक्रीटीकरण, त्यातून होणारा पर्यावरणाचा ऱ्हास याविरोधात पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी रविवारी (दि. २३) पिंपळे सौदागर येथील कोकणे चौकात साखळी आंदोलन केले. या आंदोलनात ज्येष्ठ नागरिक, महिला, मुली, लहान मुले उत्स्फुर्तपणे सहभागी झाली होती. या आंदोलनातील छायाचित्रे महापालिकेने आयोजित केलेल्या अभियानाला मिळालेला प्रतिसाद दर्शवण्यासाठी स्वतःच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याचे उघड झाले आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे रविवारी स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा ड क्षेत्रीय कार्यालय लिनियर गार्डनमध्ये जागतिक हवामान दिनानिमित्त जनजागृती मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मात्र महापालिकेविरोधातील आंदोलनाची छायाचित्रे वापरत पालिकेने स्वतःचाच उदो-उदो करण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले आहे. पिंपळे सौदागर येथील कोकणे चौकातील लिनियर गार्डनमध्ये नदी प्रदूषण, पिण्याचे पाणी केमिकलयुक्त, वृक्षतोड, हवा प्रदूषण, यासह विविध विषयांवर नागरिकांचे साखळी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे फोटो घेवून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या फेसबूक पेजवर 'स्वच्छतेला साथ देवू, निसर्गाची निगा राखू, हवामान बदलांना रोखू', असे आवाहन करण्यात आले.

मुळात नागरिकांच्या साखळी आंदोलनातून महापालिकेच्या विविध विकासकामांच्या नावाखाली सुरु असलेल्या पर्यावरणाच्या ऱ्हासाचा निषेध व्यक्त करत असताना तेच आंदोलनाचे फोटो वापरुन आपल्या अभियानाला कसा उत्तम प्रतिसाद मिळाला, लोकसहभाग वाढवण्यात आपल्याला कसे यश मिळते, हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न महापालिकेने केला आहे. महापालिकेचे जनजागृती अभियान आणि साखळी आंदोलनाचा काहीच संबंध नसल्याचे स्पष्ट असतानाही असा प्रकार केल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

### पिंपरी-चिंचवडकरांनो जागे व्हा, बघताय काय, सामील व्हा

» पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ३० लाख नागरिकांनो तुम्ही वेळीच सावध व्हा. आपल्या आजू-बाजूला सुरु असलेला नदी, नाल्यातील प्रदूषण थांबवा, वृक्षतोड थांबवा, पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करा, याकरिता पिंपरी-चिंचवडकरांनो जागे व्हा, बघताय काय, सामील व्हा, अशा आशयाचे फलक घेवून रविवारी अनेक नागरिकांनी पिंपळे सौदागर येथील कोकणे चौकात साखळी आंदोलन केले

> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या फेसबुक पेजवर पिंपळे सौदागर येथील साखळी आंदोलनाबाबत कुणी पोस्ट अपलोड केली, त्याची चौकशी करण्यात येईल. जे दोषी असतील त्यांच्यावर महापालिकेच्या नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> - सचिन पवार, उपायुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पाटबंधारे खात्याकडून इंदापूरकडे दुर्लक्ष

## पुण्याची वाढती लोकसंख्या! शहरी भागाच्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत ग्रामीण भागाचे पाणी कमी झाले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

खडकवासला कालव्यावरील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीसिंचनाचा प्रश्न जितका महत्वाचा आहे. तितकाच पुण्याच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. नेहमीच शहरी अन् ग्रामीण भागाचा पाण्यासाठीचा संघर्ष हा आपल्याला पहावयास मिळतो. धरणाच्या प्रकल्प आराखड्यात तत्कालीन धरणातील पाण्याच्या उपलब्धतेनुसार शहरी अन ग्रामीण भागासाठी पाणी आरक्षित केले गेले. आजही धरणातील पाण्याची उपलब्धता, पाणी साठवण्याची क्षमता वाढली तर नाहीच उलट गाळामुळे थोडीफार कमी झाली असेल. ग्रामीण भागातील शेती सिंचनाचा विचार केला तर त्याठिकाणी पाणी वाढविले तर नाही उलट कमी केले त्याला कारण म्हणजे पुण्याची वाढती लोकसंख्या! शहरी भागाच्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत ग्रामीण भागाचे पाणी कमी झाले.

जसजशी पुण्याची लोकसंख्या शहरीकरण वाढत गेले तसतशीच त्यांची पाण्याची मागणी वाढत गेली. त्यांच्या वाढत्या पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी नवीन स्वतंत्र व्यवस्था करणं महापालिकेकडून अपेक्षित होतं; पण त्यादिशेने कोणतेही पाऊल पुणे महानगरपालिकेकडून उचलले गेले नाही अर्थातच शेवटच्या टोकावरील खडकवासला लाभक्षेत्रातील इंदापूरच्या हक्काच्या पाण्यावर गदा आली. वास्तविक पाहता पुण्यात वेळोवेळी नवीन गावांचा समावेश केला गेला. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची मागणीही वाढली आज पुणे महानगरपालिका 21 टीएमसी पाण्याची गरज आहे, अशी मागणी करतेय, अर्थातच इंदापूरचं पाणी कमी होतंय.

अपुऱ्या पाण्याअभावी पाटबंधारे खात्याकडून इंदापूरवर दुर्लक्ष केलं जात आहे. येथील सिंचन व्यवस्था अल्पावधीतच पूर्ण संपुष्टात येण्याच्या मार्गांवर आहे. सध्या फक्त पाणी बंदोबस्तात मूळ कालव्यातून इंदापूरसाठी आणले जाते; पण ज्या वितरिका आहेत त्या पूर्ण बंद पडल्या आहेत. त्याचबरोबर पाटबंधारे खात्याचे नवे अधिकारी नवीन यंत्रणा, खासगी यंत्रणा यामुळे वितरिकेला पाणी सोडून शेतीचे सिंचनासाठी लाभधारकांना पाणी द्यावे लागते. या गोष्टीचा इंदापूरबाबतीत त्यांना पूर्ण विसर पडला आहे.

आजही धरणातील पाण्याची उपलब्धता, पाणी साठवण्याची क्षमता वाढली तर नाहीच उलट गाळामुळे थोडीफार कमी झाली असेल. ग्रामीण भागातील शेती सिंचनाचा विचार केला तर त्याठिकाणी पाणी वाढविले तर नाही उलट कमी केले त्याला कारण म्हणजे पुण्याची वाढती लोकसंख्या! शहरी भागाच्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत ग्रामीण भागाचे पाणी कमी झाले. अपुऱ्या पाण्याअभावी पाटबंधारे खात्याकडून इंदापूरवर दुर्लक्ष केलं जात आहे. येथील सिंचन व्यवस्था अल्पावधीतच पूर्ण संपुष्टात येण्याच्या मार्गांवर आहे.



### दिसून आंधळं अन ऐकून बहिरे

» इंदापूरला आवर्तन सुटले की पाटबंधारे खात्याची यंत्रणा खासगी लोकांचा ताफा बरोबर घेऊन बैलपोळ्याला ज्याप्रमाणे बैलांची मिरवणूक काढली जाते त्याप्रमाणे या पाण्याची फक्त मिरवणूक काढली जाते अन पाणी इंदापूरला पाणी पोहोचले की तात्काळ तालुक्यातील पाणी सिंचनाविनाबंद केले जाते. पाटबंधारे खात्याने काढलेली मिरवणूकही संपते अन् हा ताफा तालुका सोडून निघून जातोय. आज दिवसेंदिवस एक आवर्तन कमी केलं जातंय त्यामुळे मूळ कालवा व त्यांच्या वितरिका नामशेष होणार की काय, अशीच भीती इंदापूर लाभधारकांच्या मनात निर्माण झाली आहे. पाटबंधारे खात्याबरोबर तालुक्यातील नेत्यांनीही या पाणीप्रश्नावर दिसून आंधळं अन ऐकून बहिरे अशीच भूमिका घेतली आहे. त्यामुळे या लाभक्षेत्रातील लाभधारक आज कर्ज घेऊन कंगाल झाला आहे.

> पुणे महानगरपालिकेकडून पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करणं गरजेचं आहे किंवा तसा पर्याय नसेल तर इंदापूरसाठी त्याच तालुक्यातील उजनीच्या पाण्याची व्यवस्था महापालिकेने स्वखर्चाने करून देणं गरजेचं आहे. कारण पुणे महानगरपालिका करारापेक्षा जे जादा पाणी वापरते ते इंदापूरच्या हक्काचे पाणी आहे. त्या पाण्यावर महापालिका कर गोळा करते अर्थात महापालिकेकडून ते पाणी विकले जाते. यावर तोडगा काढण्यासाठी खडकवासला लाभक्षेत्रात येणाऱ्या ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी व पुणे शहरातील लोकप्रतिनिधी यांच्यात विचारविनिमय होऊन इंदापूरला उजनीतून पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न होणं गरजेचं आहे. इंदापूरचा पाणीप्रश्न मिटला तरच पुण्यातील शहरी भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या मिटणार आहे. कारण त्यांनाही इंदापूरचे हक्काचे शिल्लक राहिलेले पाणी शहरात पिण्यासाठी वापरता येणार आहे. म्हणजेच एका दगडात दोन पक्षी मारता येणार आहेत.
>
> **- विजय गावडे, खडकवासला प्रकल्पग्रस्त शेतकरी**

# मल्हार सर्टिफिकेशनच्या विरोधात जेजुरी ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

## श्री खंडोबा गडाचा कारभार पाहणाऱ्या विश्वस्त मंडळापैकी पाच जणांनी मटणाला मल्हारी नाव देण्यास पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचाही तीव्र निषेध यावेळी करण्यात आला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरी गडावरच्या मल्हारीचं नाव झटका मटणाला दिल्याबद्दल जेजुरी ग्रामस्थांच्या बैठकीमध्ये बंदरे व मत्स्य विकास मंत्री नितेश राणे यांचा निषेध करण्यात आला. त्याचबरोबर श्री खंडोबा गडाचा कारभार पाहणाऱ्या विश्वस्त मंडळापैकी पाच जणांनी मटणाला मल्हारी नाव देण्यास पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचाही तीव्र निषेध यावेळी करण्यात आला.



चार दिवसात विश्वस्त मंडळाने श्री खंडोबा देवाची , ग्रामस्थ व भाविकांची माफी मागावी अन्यथा त्यांना गाव बंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. खांदेकरी – मानकरी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, खंडोबा देवस्थानचे माजी विश्वस्त संदीप जगताप, सुधीर गोडसे ,जेजुरीचे इनामदार राजाभाऊ पेशवे , छबन कुदळे , प्रसाद अत्रे ,शैलेश राऊत, ॲड मंगेश जेजुरीकर, रोहिदास माळवदकर , प्रतिक जोशी ,उमेश जगताप ,अनिल झगडे यांची यावेळी भाषणे झाली. ॲड .मंगेश जेजुरीकर यांनी मुळात खंडोबा देव शाकाहारी आहे .त्याचे नाव मटन ,दारू सारख्या विषयाला वापरणे चुकीचे आहे. यामुळे मल्हारी भक्तांच्या धार्मिक भावनेला तडा गेल्याचे सांगितले.

मल्हार सर्टिफिकेशन नावावरून जेजुरीत आता प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत .मल्हार गौतमेश्वर छत्री मंदिरावर झालेल्या ग्रामस्थांच्या बैठकीनंतर ग्रामस्थांनी जेजुरी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन आपले म्हणणे मांडले. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी शिष्टमंडळाने दिलेले निवेदन स्वीकारले.

### मल्हार नाव शेती किंवा आरोग्य योजनेला द्या : संदिप जगताप

» जेजुरीचा खंडोबा बहुजनांचा देव आहे , याचे नाव वापरून मांसाहारी सर्टिफिकेट करण्याची काही गरज नाही , मल्हारीचे नाव द्यायचेच असेल एखाद्या वैद्यकीय योजनेला , शेती योजनेला द्या , मल्हारी सर्टिफिकेशनमुळे राज्यातील खंडोबा भक्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे , गावात रोष आहे, शासनाने याचा विचार करून तातडीने झटका मटणाला मल्हार नाव देण्याचा निर्णय रद्द करावा. मागील विश्वस्त मंडळाने भव्य हॉस्पिटल उभारण्यासाठी जेजुरीत जागा खरेदी केली आहे मात्र या जागेवर सध्याचे विश्वस्त मंडळ हॉस्पिटलऐवजी भक्तनिवास उभारण्याचा घाट घालीत आहे हे पूर्णतः चुकीचे आहे. जेजुरीमध्ये श्री मार्तंड देवसंस्थानचे भक्तनिवास, लॉज, पुजाऱ्यांची घरे, धर्मशाळा पुरेसे असल्याने भाविकांची राहण्याची चांगली सोय होते .मात्र तालुक्यामध्ये गोरगरीब वर्गासाठी चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा पुरविणारे हॉस्पिटल नाही.परंतु तेथे हॉस्पिटलऐवजी भक्तनिवास उभारण्याचा घाट घातला जात आहे हे पूर्णतः चुकीचे असून आम्ही या गोष्टीला विरोध करणार आहे.